N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण    **P.S.(ठाणे):** सिल्लोड ग्रामीण
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0358    **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/12/2023 23:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 01/12/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/12/2023
**Time From (वेळेपासून):** 12:28 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/12/2023    **Time (वेळ):** 22:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 045
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/12/2023 22:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 30 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तलाठी सजा आमठाणा कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** सिल्लोड ग्रामीण
**District(State) (जिल्हा(राज्य)):** औरंगाबाद ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पोपट कडुबा दिवटे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आमठाणा ,सिल्लोड ग्रामीण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आमठाणा ,सिल्लोड ग्रामीण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9420244819

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय दिगंबर विसपुते | | | 1. तळणी ,सिल्लोड ग्रामीण, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गजानन भिकन सोमासे | | | 1. आमठाणा,सिल्लोड ग्रामीण, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 18,000/ रुपये अ.पा.लावलेली लाचेची रक्कम | 18,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

18,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दि.- 01-12-2023

मी पोपट कडुबा दिवटे, वय 37 वर्षे,व्यवसाय शेती,रा. मु.पो.आमठाणा, ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9420244819

समक्ष पोलीस स्टेशन सिल्लोड ग्रामीण येथे हजर राहुन सांगतो की, "मी दिनांक 29/11/2023 रोजी आमठाणा येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली की, "मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व माझी वडीलोपार्जीत शेती असुन आम्ही शेती करतो.

माझे वडील कडुबा गणपत दिवटे यांनी त्यांचे नावे असलेली मौजे आमठाणा ता. सिल्लोड येथे गट नं 427 मध्ये क्षेत्र लागवडी योग्य 0.89 आर मधील 0.60 आर शेत जमीन वाटणीपत्रा आधारे माझे नाव करणार आहे. त्याबाबतची 7/12 मध्ये नोंद घेण्यासाठी लागणारी माहिती घेण्याकरीता मी दिनांक 24/11/2023 रोजी तलाठी सजा कार्यालय आमठाणा येथे गेलो. तेथे तलाठी विसपुते आप्पा यांची भेट झाली. त्यावेळी तलाठी विसपुते आप्पा यांनी दिनांक 28/11/2023 रोजी येऊन भेट असे सांगीतले.

दिनांक 28/11/2023 रोजी तलाठी विसपुते आप्पा यांना तलाठी सजा कार्यालय आमठाणा येथे जाऊन भेटलो. तेव्हा वाटणीपत्राव्दारे शेतजमीन माझे नावे करण्यासाठी माझे वडीलांचे नावे असलेला अर्ज त्यांना दिला असता त्यांनी तो अर्ज स्विकारला नाही. तलाठी विसपुते यांनी मला सांगीतले की, वडीलांचे नावाने 500/- रुपयाचा कोरा बॅन्ड घेऊन ये व 0.60 आर शेतजमीन तुमच्या नावाने 7/12 मध्ये नोंद घेण्यासाठी 20,000/- रुपये व अर्ज घेऊन उद्या दिनांक 29/11/2023 रोजी माझ्या कार्यालयात येे.

त्यावर मी त्यांना म्हणलो की, आम्ही गरीब लोक आहेत, आमच्याकडे इतके पैसे नाहीत. त्यावर तलाठी विसपुते आप्पा म्हणले की, तुम्ही जर पैसे नाही दिले तर मी तुझ्या नावाने वाटणीपत्राच्या आधारे असलेली 0.60 आर शेत जमीनीची नोंद 7/12 ला घेणार नाही व तुझा अर्जपण स्विकारणार नाही तुझे काम तसेच पडुन राहील. त्यावर तलाठी विसपुते आप्पा यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो.

त्यानंतर माझ्याबरोबर झालेली सर्व हकीगत माझा सख्या चुलत भाऊ लक्ष्मण दिवटे यांना सांगीतला. तेव्हा त्याच्या मार्फतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे फोन करुन पैशाची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिली. त्यानंतर आपण माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता या ठिकाणी आले आहे.

मी व माझा भाऊ सुदाम दिवटे असे आज 29/11/2023 रोजी तलाठी विसपुते आप्पा सजा आमठाणा यांना भेटण्यासाठी जाणार आहे. त्याठिकाणी माझे वडील कडुबा गणपत दिवटे सुध्दा येणार आहेत. तलाठी विसपुते आप्पा यांनी सांगीतल्याप्रमाणे मला वडीलांचे नावाने असलेला 500/- रुपयाचा कोरा बॅन्ड व अर्ज घेऊन जाणार आहे. तलाठी विसपुते आप्पा यांनी माझ्याकडे वाटणीपत्राच्या आधारे वडीलोपार्जीत 0.60 आर शेतजमीनीची 7/12 ची नोंद माझ्या नावावर करण्यासाठी 20,000/- रुपये स्वत: किंवा इतरामार्फत लाचेची मागणी करुन स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, तसेच माझी व तलाठी विसपुते आप्पा यांचे सोबत कोणतीही वैर-दुश्मनी नाही तसेच उसनवारीचा अगर देण्या-घेण्याचा व्यवहार नाही.हि विनंती."सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री सचिन सांळुखे यांनी दोन्ही शासकीय पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी दिलेली तक्रार उपस्थितीत असलेले शासकीय पंचाना वाचावयास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस निरीक्षक श्री.सचिन सांळुखे यांनी सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री सचिन सांळुखे यांनी सांगीतले की, आपणास तुमच्या तक्रारीवरुन तलाठी विसपुते आप्पा यांची लाचमागणी पडताळणी करण्यासाठी तलाठी सजा आमठाणा कार्यालयात जावे लागणार आहे. त्याकरीता तुम्ही, तुमचे भाऊ दिवटे आणि पंच क्रमांक 1 श्री मोहम्मद आसीफ असे तुमच्याकडील दुचाकी वाहनाने तलाठी

सजा आमाठाणा येथे जावे. आम्ही जाण्यापुर्वी सापळा पथकातील श्री घुसिंगे यांनी डिजीटल व्हाईसरेकॉर्डरचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन त्यामध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकले.सदरचे डिजीटल व्हाईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर असलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशारितीने व्यवस्थित ठेवले. त्यानंतर मला व पंच श्री आसीफ यांना माझ्या मोटार सायकलने तलाठी सजा आमठाणा कार्यालय कडे जाण्याकरीता रवानाझालो. आम्ही तिघे तलाठी सजा आमठाणा कार्यालयात येथे गेलो असता तेथे तलाठी विसपुते आप्पा यांची भेट झाली त्यानंतर माझी, माझ्या वडील कडुबा व तलाठी विसपुते आप्पा यांच्यात माझ्या वडीलांचे नावे असलेल्या को-या 500/- रुपयाच्या बॉन्ड वर वाटणीपत्र तयार करुन आणण्याबाबत व वाटणीपत्रानुसार माझ्या नावावर 0.60 आर शेतजमीनीची 7/12 वर नोंद घेण्यासाठी चर्चा झाली. आमचे चर्चेदरम्यान त्यानंतर श्री. विसपुते आप्पा यांनी तक्रारदार यांच्या वडीलांना पोर जिव लावतील का असे विचारले त्यावर तक्रारदार यांचे वडील म्हणाले की, मग..मी समदी राशीद देवुन टाकायला राजी आहे त्याह्याला आन आता पासुनच आपल्याला काही नको आशा..दोन दोन वेळेस खर्च करायला काय रिकामे काम हे ते.. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. विसपुते आप्पा यांना म्हणाले की, तुम्ही सांगा ईतक ईतक देन पडन म्हणा तुम्हाला..त्यावर विसपुते आप्पा म्हणाले की, मी सांगतो तुम्हाला त्यातले हजार पाचशे कमी द्या बाकीचे करून टाका..त्यावर तक्रारदार म्हणले की, आठरा हजारमध्ये द्या करून..त्यानंतर श्री. विसपुते आप्पा म्हणाले की आना करून..त्यावर तक्रारदार म्हणाले की, आठरामध्ये होईल ना मग..त्यानंतर श्री. विसपुते आप्पा म्हणाले की कस होईल अशान..घ्या करून असे बोलणे झाल्यावर माझे वडील सुदाम सोबत घरी गेले व मी, पंच श्री आसीफ असे मोटारसायकलने शासकीय वाहन थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. त्यानंतर आम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो व वरील सर्व हकीगत पोलीस निरीक्षक श्री सचिन सांळुखे यांना सांगीतली. त्यावरुन तलाठी विसपुते आप्पा यांनी 500/- रुपयाच्या कोरा बॅन्ड पेपर वाटणीपत्र तयार करुन आण्यासाठी व वाटणीपत्रानुसार शेतजमीन 0.60 आर 7/12 नोंद घेण्यासाठी माझ्याकडे 20000/- रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 18000/- रुपये पंचा समक्ष लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले आहे. त्यानंतर मी व माझे भाऊ सुदाम दिवटे असे को-या 500/- रुपयाच्या बॉन्डवर वडीलाचे वाटणीपत्र तयार करण्यासाठी व 18000/- रुपये रक्कम आणण्यासाठी गावात गेलो. काही वेळाने आम्ही वाटणीपत्र तयार करुन व 18000/- रुपये घेऊन पोलीस निरीक्षक श्री सांळुखे यांच्याकडे परत आलो. त्यावेळी मला माहिती मिळाली की, तलाठी विसपुते आप्पा हे तलाठी सजा आमठाणा कार्यालय बंद करुन बाहेर गेले आहे.

दिनांक 01/12/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री सांळुखे यांनी मला, सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली व तलाठी विसपुते आप्पा यांनी लाच स्वीकरल्यानंतरचा नियोजीत ईशारा करण्यास सांगीतले. मी माझ्या भाऊ सुदाम व लक्ष्मण यांच्याकडुन रक्कम 18,000/- रुपये उपलब्ध झाल्याने पोलीस निरीक्षक श्री सचिन सांळुखे यांच्यासमोर हजर केले. त्यावर श्री सचिन सांळुखे साहेबांनी व पंचांनी तलाठी विसपुते आप्पा यांना लाच मागणी केल्याप्रमाणे 18,000/- रुपये उपलब्ध झाल्याने लाचेची रक्कम देण्याचा निर्णय सर्वनुमते घेण्यात आला.

मी आणलेले 18000/- रुपये नोटांना अँन्थ्रॅसीन पावडर लावून लाचेची रक्कम तलाठी विसपुते आप्पा यांना देण्याकरीता माझे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली व व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याजवळ दिला. त्यानंतर मी, माझा भाऊ सुदाम दिवटे व पंच आसीफ असे सुरक्षित ठिकाणाहुन दुचाकी वाहनाने तलाठी सजा आमठाणा कार्यालयाकडे रवाना झालो.

माझी व तलाठी विसपुते आप्पा यांची भेट झाली त्यावेळी आमच्या मध्ये वडीलांचे नावे असलेली गट नं 427 मधील 0.89 शेतजमीन पैकी वाटणीपत्राव्दारे माझ्या नावावर केलेली 0.60 आर शेत जमीन 7/12 मध्ये नोंद घेण्याबाबत चर्चा करुन माझ्या जवळ असलेला अर्ज मी तलाठी विसपुते आप्पा यांच्याकडे दिला. तलाठी कार्यालयात आप्पाच्या शेजारी आमच्या गावातील गजानन नावाचा मुलगा सदर ठिकाणी उभा होता. तलाठी विसपुते आप्पा यांनी गजाननकडे हाताने इशारा करुन गजाननकडे पैसे देण्याचे खुणविले. त्यावेळेस मी, माझा भाऊ सुदाम व पंच क्र 1 असे तलाठी रुमच्या समोरील पॅासेज मध्ये आलो. त्यावेळेस गजानन हा सुध्दा आमच्या मागे पॅासेज मध्ये येऊन उभा राहिला. तेव्हा मी, श्री गजानन यास म्हणालो की, नाही आलक आलक हे आम्ही आमठाणाचे ते धावडाचे, देवु, त्यावेळेस भाऊ सुदाम म्हणला की, हा.. दे (गजानन याचे कडे हाताने इशारा करुन), त्यावर मी म्हणालो की, त्यांचे त्यांच्याकडे दिले त तान राहत नाही, त्यावर श्री गजानन म्हणला की, नाही नाही तस काही नाही, त्यावर मी म्हणलो की, देवुन टाकु का मग, त्यावर श्री विसपुते आप्पा म्हणाले की, देवुन टाका ना, त्यावर मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशातुन उजव्या हाताने 18000/- रुपये लाचेची रक्कम काढुन पंचासमक्ष गजानन यांच्यासमोर धरुन म्हणलो की, घ्या मोजुन तेव्हा गजानन याने त्याच्या उजव्या हाताने लाचेची 18,000/- रुपये रक्कम स्विकारुन उजव्या हातात धरुन ठेवली. तेव्हा माझे भाऊ सुदाम हे गजानन यास म्हणाले की, साहेबाकडे दे ना तु, दे

ना तु साहेबाकडे, परंतु सदर गजानन काहीतरी संशय आल्याने त्याने त्यांच्या हातात असलेली ऍथ्रासीन पावडर लावलेली लाचेची 18,000/- रुपये रक्कम खाली जमीनीवर टाकुन तलाठी कार्यालयातुन बाहेर निघुन गेला. तेव्हा मी व पंच गोंधळलेलो आणि खाली जमीनीवर टाकलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटा जमा करु लागलो. त्यामुळे मला सापळा पथकास इशारा करता आला नाही. सदरची सर्व घटना तलाठी विसपुते आप्पा यांनी रुममध्ये दिसत होती. ते सुध्दा लगेच तलाठी कार्यालयातुन बाहेर निघुन गेले. त्यावेळेस माझे भाऊ सुदाम दिवटे यांनी पोलीस निरीक्षक श्री साळुंखे यांना मोबाईलवर मिसकॉल दिला. ती वेळ 12.28 अशी होती.
त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री सचिन साळुंखे साहेब हे सापळा पथकासह हजर आले. तेव्हा झालेली सर्व हकीगत मी पोलीस निरीक्षक श्री साळुंखे यांना सांगीतली. तेव्हा लगेच पोलीस निरीक्षक श्री साळुंखे यांनी सापळापथकास व माझे भाऊबंधुना गांवामध्ये तलाठी विसपुते आप्पा व गजानन यांना शोधण्यासाठी रवाना केले. काही वेळात मिळालेल्या माहितीवरुन तलाठी विसपुते आप्पा व गजानन हे गावाबाहेबर भराडीकडे जाणा-या रोडच्या बाजुला श्री दाणेकार यांच्या घराच्या मागील बाजुला असलेल्या एका पत्र्याच्या शेड मध्ये असल्याची माहिती मिळुन आले. तेव्हा सापळा पथक, आम्ही सर्वजण सदर ठिकाणी पोहचलो. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री साळुंखे यांनी स्वत:चा परिचय देऊन तलाठी विसपुते आप्पा यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री संजय दिगंबर विसपुते वय 49 वर्ष धंदा नौकरी, पद-तलाठी, मौजे आमठाणा सजा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर, रा. मु.तळणी ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले व गजानन यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री गजानन भिकन सोमासे वय 26 वर्ष व्यवसाय शिक्षण व शेती, रा मौजे आमठाणा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर, असे सांगीतले.
त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष पत्र्याच्याशेड मध्ये अंधार करुन आलोसे श्री विसपुते यांच्या दोन्ही हाताच्या तळ हातावर व अंगात परिधान केलेल्या कपडयावर अल्ट्रा व्हायलेट लॅम्पच्या सहाय्याने प्रकाश टाकुन निरीक्षण केले असता आलोसे श्री. विसपुते यांच्या अंगावर परिधान केलेल्या कपडयावर व दोन्ही हातावर ऍथ्रासीन पावडरची हिरवट/ताबुस रंगाची चकाकी दिसुन आली नाही. सदरची वस्तुस्थिती आलोसे तलाठी विसपुते आप्पा व गजानन यांचे निदर्शनास आणुन दिली.
त्यानंतर खाजगी आरोपी गजाजन यांच्या दोन्ही हाताच्या तळ हातावर व अंगात परिधान केलेल्या कपडयावर अल्ट्रा व्हायलेट लॅम्पच्या सहाय्याने प्रकाश टाकुन निरीक्षण केले असता खाजगी इसम गजानन यांच्या उजव्या हाताच्या पाचही बोटांचे पेऱ्यावर अँथ्रासीन पावडरची हिरवट/ताबुस रंगाची चकाकी दिसुन आली. सदरची वस्तुस्थि आलोसे तलाठी विसपुते आप्पा व गजानन यांचे निदर्शनास आणुन दिली. त्याबाबत सविस्तर पंचनामे पोलीस निरीक्षक श्री सचिन साळुंखे साहेब यांनी केलेले आहेत.
दिनांक 29/11/2023 रोजी आलोसे श्री संजय दिगंबर विसपुते वय 49 वर्ष धंदा नौकरी, पद- तलाठी, मौजे आमठाणा सजा,ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर,रा.मु.तळणी ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी माझ्या वडीलांचे नावे असलेली गट नं 427 मधील 0.89 शेतजमीन पैकी वाटणीपत्राव्दारे माझ्या नावावर केलेली 0.60 आर शेत जमीनीची नोंद 7/12 मध्ये घेण्यासाठी पंचासमक्ष 20000/-रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 18000/- रुपयाची लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले.
आज दिनांक 01/12/2023 रोजी आलोसे श्री.संजय दिगंबर विसपुते वय 49 वर्ष धंदा नौकरी, पद- तलाठी, मौजे आमठाणा सजा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर, रा. मु.तळणी ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या सांगण्यावरुन खाजगी आरोपी श्री. गजानन भिकन सोमासे वय 26 वर्ष व्यवसाय शिक्षण व शेती, रा मौजे आमठाणा, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर, यांनी तलाठी सजा आमठाणा कार्यालय समोरील पॅसेज मध्ये माझ्याकडुन वडीलांचे नावे असलेली गट नं 427 मधील 0.89 शेतजमीन पैकी वाटणीपत्राव्दारे माझ्या नावावर केलेली 0.60 आर शेत जमीनीची नोंद 7/12 मध्ये घेण्यासाठी ऍथ्रासीन पावडर लावलेली 18000/- रुपये लाचेची रक्कम 12.28 वाजता पंचा समक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन मी वाचुन पाहिली आहे. ती बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SITARAM MANJAJI MEHETRE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस उपनिरीक्षक/हवालदार
पोलीस स्टेशन सिल्लोड (ग्रा.)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SITARAM MANJAJI ME
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI